# जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग
# (पुरवठा शाखा)

## संपर्क अधिकारी

**अपर जिल्हाल्हाधिकारी- श्री. डी.एस. पाटील**

**दुरध्वनी क्रमांक -** 02362-228855 (**कार्यालय**)
02362-228080 (**निवास**)
**मोबाईल क्रमांक-** 9421262727
**ईमेल-** ceo_praadhikaran @yahoo.co.in

**जिल्हा पुरवठा अधिकारी- श्री. जि .डी.कदम (प्रभारी)**

**दुरध्वनी क्रमांक. -** 02362-228846
**मोबाईल क्रमांक.-** 9422376683

# पुरवठा विषयक संक्षिप्त टिपणी.

## सार्वजनिक वितरण व्यवस्था.

या विभागाकडून विविध सांविधानिक आदेशाअन्वये खालिल प्रमाणे परवाने या जिल्हयात देण्यात आले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | रास्तभाव धान्य दुकाने | ४१५ |
| २ | घाऊक रॉकेल परवाने | ९ |
| ३ | किरकोळ रॉकेल परवाने | ५१६ |
| ४ | हॉकर परवानाधारक | १ |
| ५ | पेट्रोल डिझेल परवानाधारक | २५ |
| ६ | गॅस वितरक | ६ |
| ७ | साखर नॉमिनी | ७ |
| ८ | गोदाम. | ९ (क्षमता ७२५० मे.टन) |

## सांविधानिक आदेशाखालिल तालुकावार परवानाधारकांची संख्या.

| अ नं. | परवान्याचा प्रकार | सावंत वाडी | कुडाळ | वेंगुर्ला | दोडा मार्ग | कणक वली | माल वण | देव गड | वैभव वाडी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | रास्त भाव धान्य दुकान | ५७ | ७३ | ३९ | २१ | ६५ | ६३ | ६२ | ३५ | ४१५ |
| २ | किरकोळ केरोसीन परवाना | ६९ | ७९ | ३२ | ३२ | ६७ | ९९ | ११४ | २४ | ५१६ |
| ३ | हॉकर परवाना धारक | - | - | - | -- | १ | - | - | - | १ |
| ४ | पेट्रोल डिझेल | ३ | ७ | २ | - | ६ | ३ | २ | २ | २५ |
| ५ | गॅस वितरक | २ | १ | १ | - | १ | १ | - | - | ६ |
| ६ | साखर नॉमिनी | १ | १ | १ | - | १ | १ | १ | १ | ७ |
| ७ | साखर घाऊक परवाने | ८ | ३ | २ | - | ८ | १ | १ | - | २३ |

## **जिल्हयाची शिधापत्रिकाबाबतची माहिती खालिल प्रमाणे आहे.**

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण तालुके- **८** | | | | | | | | | |
| जिल्हयाची लोकसंख्या- **८,६८,८२५** | | | | | | | | | |
| कार्ड संख्या | सावं तवाडी | दोडा मार्ग | कुडाळ | वेंगुर्ला | माल वण | कणक वली | देवगड | वैभव वाडी | एकूण |
| **शहरी** | | | | | | | | | |
| अेपीएल | ४८८९ | ० | २८७४ | २८६४ | ४३२० | ३३१८ | ३३६५ | ० | २१६३० |
| बीपीएल | १८६ | ० | २२० | ४१५ | ५९७ | २७१ | ११०९ | ० | २७९८ |
| अंत्योदय | ८६ | ० | ७९ | ९५ | १०७ | ५१ | २८० | ० | ६९८ |
| शुभ्र | २१३ | ० | २४२ | १६१ | ६३ | २५६ | ७३ | ० | १००८ |
| **एकूण** | **५३७४** | **०** | **३४१५** | **३५३५** | **५०८७** | **३८९६** | **४८२७** | **०** | **२६१३४** |
| **ग्रामीण** | | | | | | | | | |
| अेपीएल | १८८४६ | ६८३० | १५१०९ | ७६४८ | १३४९८ | १६५३४ | १५५७८ | ९२९१ | १०३३३४ |
| बीपीएल | ६०९६ | १९४० | १०३३४ | ७६८५ | ७९२१ | ८१२३ | ५८७१ | ३०६३ | ५१०३३ |
| अंत्योदय | २७९५ | ८१२ | ४७३२ | २४८४ | २५२९ | ३५४३ | २०९५ | १८८० | २०८७० |
| शुभ्र | ३३३ | ९२ | ४८९ | १७५ | १०९ | ५२२ | १८४ | ६० | १९६४ |
| **एकूण** | **२८०७०** | **९६७४** | **३०६६४** | **१७९९२** | **२४०५७** | **२८७२२** | **२३७२८** | **१४२९४** | **१७७२०१** |
| **एकूण** | **३३४४४** | **९६७४** | **३४०७९** | **२१५२७** | **२११४४** | **३२६१८** | **२८५५५** | **१४२९४** | **२०३३३५** |

## जिल्हयात पुरवठा यंत्रणेमार्फत खालिल योजना राबविण्यात येतात.

१) अेपीएल योजना.
२) बीपीएल योजना
३) अंत्योदय, विस्तारीत अंत्योदय व व्दितीय विस्तारीत अंत्योदय अन्न योजना
४) केंद्रिय अन्नपूर्णा योजना
५) विशेष घटक योजना
६) संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना
७) एकात्मिक बाल विकास सेवा योजना (अंगणवाडी)
८) आश्रमशाळा, नारीनिकेतन/वसतिगृहे इत्यादी कल्याणकारी संस्थाना बीपीएलचे दराने धान्य पुरवठा.
९) शालेय पोषण आहार (तांदूळ वाटप) योजना
१०)साखर.

### १) एपीएल योजना.

वार्षिक उत्पन्न १५००१ ते १,००,००० पर्यंत असलेल्या लाभार्थीना केशरी शिधापत्रिका देण्यात आल्या आहेत. सदरच्या योजनेखाली १३४२९१ इतकी लाभार्थी संख्या आहे. अशा कार्डधारकांना दर महा तांदूळ १५ किलो व गहू २० किलो या प्रमाणे एकूण ३५ किलो धान्य वितरीत करण्यात येते. एपीएल धान्याचे दर तांदूळ ९.५० किलो व गहू ७.०० या प्रमाणे किरकोळ विक्रीचा दर आहे.

### २) बीपीएल योजना

वार्षिक उत्पन्न १५,०००/- रुपये पर्यंत असणाऱ्या लाभार्थीना पिवळी शिधापत्रिका वितरीत करण्यात आल्या आहेत. सदरच्या योजनेखाली ५७,७१४ एवढे लाभार्थी (कार्डधारक) आहेत. अशा कार्डधारकांना दरमहा तांदुळ २५ किलो व गहू १० किलो या प्रमाणे एकूण ३५ किलो धान्य वितरीत करण्यात येते. बीपीएल धान्याचे ६/- रु.किलो व गहू ५/- रुपये या प्रमाणे किरकोळ विक्री दर आहे.

### ३) अंत्योदय, विस्तारीत अंत्योदय व व्दितीय विस्तारीत अंत्योदय अन्न योजना-

अंत्योदय अन्न योजने अंतर्गत गावातील बीपीएल कुटूंबाचे सख्येस ०.२१९४२२ ने गुणून येणाऱ्या संख्येइतके लाभार्थी प्रत्येक गांवामध्ये निवडण्यात आलेले असून या योजने अंतर्गत लाभार्थ्यांची संख्या १४१९९ इतकी आहे.

तसेच शासनाच्या ८ मे २००१ च्या शासन निर्णयानुसार ज्या कुटूंबाचे प्रमुख्य विधवास्त्रि अथवा आजारी अथवा अपंग किंवा ६० वर्षे वयावरील असलेले वृध्द आहेत अशा व्यक्ती व आदिवासी मिळून ५४५८ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आलेला आहे.

तसेच १३ ऑगष्ट २००४ च्या शासन पत्रानुसार वरील प्रमाणे परंतु भुमिहिन शेतमजूर अल्प भूधारक, ग्रामीण कारागीर यांचा समावेश करुन आणखी २६२२ लाभार्थ्यांना मिळून एकूण २२२७९ लाभार्थी अंत्योदय योजनेचा लाभ घेत आहेत. अशा कार्डधारकांना दरमहा तांदूळ २३ किलो व गहू १२ किलो या प्रमाणे एकूण ३५ किलो धान्य वितरीत करण्यात येते. अंत्योदय धान्याचा तांदूळ ३/- रु. व गहू २/- रु. याप्रमाणे किरकोळ विक्रिचा दर आहे.

**४) केंद्रिय अन्नपूर्णा योजना -**

शासन २० जून २००० च्या शासन निर्णयानुसार जे निराधार असलेल्या व ज्यांना उत्पन्नाचे निश्चित साधन नाही अशा १५०० लाभार्थ्यांना (६५ वर्षावरील स्त्रि पुरुष) अन्नपूर्णा योजने अंतर्गत लाभ दिला जातो. पात्र लाभार्थीस दरमहा १० किलो तांदूळ मोफत दिला जातो.

**५) विशेष घटक योजना -**

महसूल व वन विभाग यांचे दिनांक ५.८.२००२ च्या शासन निर्णयानुसार टंचाई सदृश्य परिस्थिती घोषीत केलेल्या जिल्हयातील अतिरिक्त रोजगार निर्मितीच्या कामावर म्हणजेच राज्य शासनाच्या रोजगार हमी योजनेच्या कामावर हे धान्य वाटप केले जाते. ही कामे संपूण्र ग्रामीण रोजगार योजने अंतर्गत विशेष घटक योजनेशी जोड देवून मजूरीचा भाग म्हणून धान्य वाटप केले जाते. या योजने अंतर्गत मजूरांना मजूरीचा भाग म्हणून प्रतिमनुष्य प्रतिदिन ५ किलो या प्रमाणे गव्हा धान्याकरीता प्रति किलो ५/- रुपये व तांदळाकरीता ६/- प्रमाणे मजूरीतून रक्कम वळती करुन आवश्यक ती धान्य कुपने दिले जाते व त्यानुसार धान्य दुकानामार्फत मजूरांना धान्य वाटप केले जाते.

**६) संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना -**

शासनाच्या ८ फेब्रुवारी २००२ च्या शासन निर्णयानुसार केंद्र शासनाने दारिद्रय निर्मुलनाचा महत्वपूर्ण भाग म्हणून संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना सुरु करण्यात आलेली आहे. स्थानिक रोजगार देणेच्या उद्देशाने सदर योजना कार्यान्वीत करणेत आलेली आहे. या योजने अंतर्गत मजूरी अदा करताना एकूण मजूरीतून धान्याची किंमत कमी करुन उर्वरीत मजूरी मजूरांना रोखीने दिली जाते. त्यानुसार ५० टक्के मजूरी रोख स्वरुपात व ५० टक्के धान्य स्वरुपात आदा केली जाते. त्यानुसार रोजगाराचा भाग म्हणून मजूरांना प्रति मनुष्य प्रति दिनी ५ किलो अन्नधान्य (गहू/तांदूळ) वाटप केले जाते. मात्र शासनाचे दिनांक ७/१०/०५ चे पत्राने १ नोव्हेंबर ०५ ते ३१ मार्च ०६ पर्यंत प्रति मनुष्य प्रतिदिनी ५ कि.ग्रॅ. ऐवजी ३ कि.ग्रॅ प्रमाणे धान्य देण्याच्या सूचना आहेत.

## ७) एकात्मिक बाल विकास सेवा योजना (अंगणवाडी) -

एकात्मिक बालविकास योजने अंतर्गत खालिल लाभार्थ्यांना पूरक पोषण आहार वाटप केला जातो.
१) ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील मुले, २) गरोदर महिला, ३) स्तनदा माता.

जिल्हयातील अंगणवाडी केंद्रांची संख्या - ९०४

| **लाभार्थी संख्या -** | | |
|---|---|---|
| | ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील मुले. | ४३०६९ |
| | गरोदर महिला | २६६४ |
| | स्तनदा माता. | ३७४० |
| | एकूण | **४९४७३** |

## ८) आश्रमशाळा, नारीनिकेतन/वसतिगृहे इत्यादी कल्याणकारी संस्थाना बीपीएलचे दराने धान्य पुरवठा. -

शासन निर्णय क्रमांक साविव्य.१००२/११३७/प्र.क्र.९७३ दिनांक २६.४.२००२ अन्वये जिल्हयातील आश्रामश्ंाळा/वसतीगृहे/नारीनिकेतन इत्यादीना दरमहा प्रति माणसी १५ किलो धान्य देण्यात येते. जिल्यामध्ये एकूण १७० लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ दिला जातो.

## ९) शालेय पोषण आहार (तांदूळ वाटप) योजना -

शालेय पोषण आहार योजने अंतर्गत शासनाने माहे जून २००२ पासून रास्त भाव धान्य दुकाना मार्फत आस्थापना शिधापत्रिकेवर संबंधीत शाळांना तांदूळ वितरण करण्याची नवीन कार्यपध्दती सुरु केलेली आहे. मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, शालेय पोषण शिक्षण विभागाकडील शासन परिपत्रक क्रमांक शापोआ २००३/(१११/०३) प्रशि ४, दिनांक १८ जून २००३ अन्वये शालेय पोषण आहार योजने अंतर्गत प्रति विद्यार्थी २.३०० कि.ग्रॅ. प्रमाणे वितरण करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत. सन २००६-०७ या वर्षात सिंधुदुर्ग जिल्हयासाठी शालेय पोषण आहार योजने अंतर्गत दरमहा १३०५.६९.००० क्विं. या प्रमाणे मासिक नियतन मंजूर केलेले आहे. या जिल्हयामध्ये इयत्ता १ ली ते ५ वी पर्यंत वर्ग असलेल्या एकूण १६३३ इतक्या शाळा आहेत व सर्व (१००%)शाळांमधून अन्न शिजवून देणेची कार्यवाही सुरु आहे. माहे
मार्च ,२००७ अखेर नियतन उचल करण्यात आलेले आहे. त्याचे वितरण सुरु आहे.

**केरोसीन** -

या जिल्हयाची केरोसीनची गरज १६५५ कि.लि. असून शासनाकडून माहे मार्च २००७ करीता ११५२ कि.लि. केरोसीन नियतन मंजूर झालेले असून वाटप सुरु आहे.

| एकूण महसुली गांव | केरोसीन परवाना असलेली गांवे | केरोसीन परवान्याची संख्या | केरोसीन परवाने नसलेली गांवे |
|---|---|---|---|
| ७४६ | ३७१ | ५१६ | ३७५ |

## केरोसीन वितरणाचे प्रमाण.

शासन निर्णय क्र.रॅाकेल-१०००/प्र.क्र. ७९७/नापु.२७, दि. २६ डिसेंबर २००३ अन्वये १००% केरोसीनचे वितरणाचे प्रमाण

| शहरी. | | ग्रामीण | |
|---|---|---|---|
| व्यक्ति | लिटर | व्यक्ति | लिटर |
| १ | ३ | १ | २ |
| २ | ६ | २ | ४ |
| ३ | ९ | ३ | ६ |
| ४ | १२ | ४ | ८ |
| ५ | १५ | ५ | १० |
| ६ | १८ | ६ | १२ |
| ७ | २० | ७ | १४ |
| ७ पेक्षा जास्त व्यक्ती. | २० | ७ पेक्षा जास्त व्यक्ती | १४ |

## माहे मार्च २००६ अखेर ७०% प्रमाणे केरोसीनचे वितरण

| अ.नं. | तालुका | १००% प्रमाणे गरज (किलो लीटर) | मंजूर नियतन (किलो लीटर) | उचल व वाटप (किलो लीटर) |
|---|---|---|---|---|
| १ | सावंतवाडी | २५८ | १८० | १८० |
| २ | वेंगुर्ला | १८१ | १२० | १२० |
| ३ | कुडाळ | ३०५ | २०४ | २०४ |
| ४ | कणकवली | ३५७ | १८० | १८० |
| ५ | देवगड | २४४ | १६८ | १६८ |
| ६ | मालवण | २१७ | १६८ | १६८ |
| ७ | वैभववाडी. | ११४ | ७२ | ७२ |
| ८ | दोडामार्ग | ७९ | ६० | ६० |
| | **एकूण** | | **११५२** | **११५२** |

## घाऊक केरोसीन डिलर यांची माहिती

| अ.क्र | केरोसीन डिलरचे नांव | कंपनीचे नांव | महिन्याचे मंजुर केरोसीन (किलो लीटर) |
|---|---|---|---|
| १ | मे.एम.ए.स्वार, वेंगुर्ला | बीपीसी | १६८ |
| २ | पी.जी.शिरोडकर, मालवण | बीपीसी | १४४ |
| ३ | मे. डब्ल्यू वाय पोकळे, देवगड | बीपीसी | १९२ |
| ४ | मे. आर.एस.भांगले, सावंतवाडी | एचपीसी | १३२ |
| ५ | मे.एस.व्ही.दळवी, कुडाळ | एचपीसी | १३२ |
| ६ | मे.पी.डी.कामत,कणकवली | एचपीसी | १४४ |
| ७ | मे.ए.व्ही.प्रभुखानोलकर, वेंगुर्ला | आयओसी | ७२ |
| ८ | मे.जी.आर पाटकर , मालवण | आयओसी | ९६ |
| ९ | मे.शेतकरी सह.संघ कोल्हापूर शाखा वैभववाडी | आयओसी | ७२ |
| | | एकूण | ११५२ |

## <u>किरकोळ, घाऊक, अर्धघाऊक, हॅाकर्स केरोसीन परवान्याबाबतची माहिती.</u>

| अ नं. | परवान्याचा प्रकार | सावंत वाडी | कुडाळ | वेंगुर्ला | दोडा मार्ग | कणक वली | माल वण | देव गड | वैभव वाडी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | घाऊक केरोसीन परवानाधारक | १ | १ | २ | - | १ | २ | १ | १ | ९ |
| २ | किरकोळ केरोसीन परवाना | ६९ | ७९ | ३२ | ३२ | ६७ | ९९ | ११४ | २४ | ५१६ |
| ३ | हॅाकर परवाना धारक | - | - | - | -- | १ | - | - | - | १ |
| ४ | पेट्रोल डिझेल | ३ | ७ | २ | - | ६ | ३ | २ | २ | २५ |
| ५ | गॅस वितरक | २ | १ | १ | - | १ | १ | - | - | ६ |
| ६ | अर्धघाऊक | - | - | - | - | - | - | - | - | - |

## किरकोळ केरोसीन परवान्यासाठी अर्ज करण्याचे निकष

ज्या गावांसाठी किरकोळ केरोसीन परवाना मंजूर करावयाचा असेल अशा गांवांकरिता जिल्हा पुरवठा अधिकारी त्या त्या गावासाठी जाहिरनामे प्रसिध्द करु शकतात.

**किरकोळ केरोसीन परवान्याचे अर्ज करण्यासाठी खालीलप्रमाणे अटी व शर्ती आहेत.**

१) जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासनू १० दिवसांच्या आत इच्छूक व्यक्तींनी तहसिलदार यांचेकडे विहित - नमुन्यात अर्ज सादर करावयाचा आहे.

२) ज्या व्यक्तींकडे किंवा त्यांच्या कुटुंबाकडे तसेच सहकारी संस्थेकडे यापुर्वी रॅाकेल परवाना असल्यास अशा अर्जाचा विचार केला जाणार नाही.

३) अर्जदार संस्था नोंदणीकृत असल्यास संस्थेच्या आर्थिक परिस्थितीबाबत व कार्यक्षमतेबाबत सहाय्यक निबंधक यांचे अभिप्राय जोडणे आवश्यक आहे.

४) अर्जदार संस्था नोंदणीकृत नसल्यास तिच्या कायदेशीर अस्तित्वाब ाबत पुरावा जोडणे आवश्यक आहे.

५) व्यक्तीगत अर्जदाराने आर्थिक क्षमतेबाबत ( पोस्टाचे/बॅंकेच्या पासबुकाची झेरॅाक्स प्रत ) पुरावा जोडणे आवश्यक आहे.

६) अर्जदाराकडे कार्डधारकांना सोयीस्कर वाहतूक सुलभ होईल अशी वाणिज्य अकृषीक असलेली जागा किरकोळ केरोसीन व्यवसायासाठी उपलब्ध असणे आवश्यक आहे. (व्यवसायाची जागा अकृषीक असल्याबाबतचा पुरावा जोडणे आवश्यक व घरपत्रकाचा उतारा.)

७) अर्जदार व्यक्ती अन्य व्यक्तीच्या जागेत व्यवसाय चालविणार असल्यास त्या इसमाचे रु.१००/- च्या स्टॅंम्पपेपरवर कबुलीपत्र (संमत्तीपत्र) व ग्रामपंचायतीकडील घरपत्रकाचा उतारा जोडणे आवश्यक आहे.

८) अर्जासोबत जागेचा ७/१२ उतारा व जागेचा नकाशा जोडणे आवश्यक आहे.

९) अर्जदार सुशिक्षित बेकार असल्यास सेवा योजन/समाज कल्याण कार्यालयाचे ओळखपत्र जोडणे आवश्यक आहे.

१०)ग्रामपंचायतीचा नाहरकत दाखला.

११)पोलीस अधीक्षक यांचेकडील वर्तणूकीचा दाखला.

१२) कोणताही अर्ज मंजूर अथवा नामंजूर करणे ही बाब खालील सही करणार यांचे अखत्यारितील राहील.

किरकोळ केरोसीन अनामत रक्कम ३०००/-
परवाना फी ५००/-
नुतनीकरण फी रु. २५०/-
नुतनीकरण विलंब दंड दर दिवशी रु. ५/-

**शासन निर्णय क्र. रॉकेल-१००३/प्र.क्र.३२४९/नापु-२७ दिनांक २० फेब्रुवारी २००४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे अग्रक्रम सूचीप्रमाणे किरकोळ केरोसीन परवाने मंजूर केले जातात.**

१) अधिकृत शिधावाटप/रास्त भाव धान्य दुकानदार (या संवर्गाचा केरोसीन परवाना मंजूरीसाठी विचार करताना कार्यरत परवानाधारकांविरुध्द गेल्या वर्षाच्या कालावधीत अकार्यक्षम व्यवसाय, धान्याचा गैरव्यवहार याकरिता अनामत रक्कम जप्त, निलंबन, परवाना रद्द करणे, दंडात्मक कारवाई यासारखी शिक्षा झालेली असू नये.)
२) सुशिक्षित बेरोजगार
३) अपंग व्यक्ती
४) माजी सैनिक, रणांगणात धारातीर्थी पडलेल्या अथवा माजी सैनिकांची विधवा पत्नी, त्यांचा सज्ञान मुलगा अथवा सज्ञान अविवाहित मुलगी.
५) प्रकल्पग्रस्त व्यक्ती.
६) अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमातीमधील व्यक्ती.
७) मागासवर्गीय ग्राहक सहकारी संस्था
८) स्त्रियांची ग्राहक सहकारी संस्था
९) इतर ग्राहक सहकारी संस्था
१०) ग्राम पातळीवरील विविध सेवा सहकारी संस्था
११) इतर
१२)

किरकोळ केरोसीन परवाना अर्जदार व्यक्ती/संस्थेस मंजूर करणेसाठी वरीलप्रमाणे अटी शर्ती असल्या तरी शासन प्रचलित आदेशानुसार त्यामध्ये बदल करणेत येतो.

**किरकोळ/हॉकर्स केरोसीन परवानाधारकांच्या मृत्युनंतर परवानाधारकांच्य वारसाच्या नावे परवाना वर्ग करण्याबाबत खालील मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन कार्यवाही करण्यात येते.**

१) केरोसीन परवानाधारकचा मृत्यू झाल्यास, सदरहू परवाना त्याच्या वारसाच्या नावे वर्ग करताना, कुटूंबाच्या व्याख्येत समाविष्ट केल्याप्रमाणे वारसांमध्ये परवानाधारकाची पत्नी अथवा पती, सज्ञान मुलगा, सज्ञान अविवाहीत मुलगी,परवानाधारकावर अवलंबून असणारे आई-वडील,सून,कायदेशीर वारसदार, दत्तक पूत्र व परवानाधारकावर अवलंबून असणारी घटस्फोटीत मुलगी यांचा समावेश करण्यात येतो.

२) किरकोळ केरोसीन परवानाधारकाचा मृत्यु झाल्यास, परवानाधारकाच्या मृत्युपासून ९० दिवसाच्य आत, परवनाधारकाच्या वारसाने अर्ज केल्यास व तो परवान्याबाबतच्या अटी/शर्ती पूर्ण करीत असल्यास, सदर परवाना अशा वारसाच्या नावावर, दिनांक २१/७/२००० व दिनांक २४/११/२००० रोजीच्या शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार वारसाच्या नावे वर्ग करण्यात येतो.

३) ज्या ठिकाणी एकापेक्षा जास्त वारस असतील, त्या ठिकाणी ज्या वारसाच्या नावे परवाना वर्ग करावयाचा आहे, त्या वारसाने इरत वारसांचे रक्कम रुपये १००/- च्या बॉण्ड पेपरवर नाहरकत प्रमाणपत्र अनुज्ञप्ती प्राधिका-यांना समक्ष सादर करणे आवश्यक आहे, जेणेकरुन इरत वारसांमध्ये वाद निर्माण होऊन परवाना वर्ग करण्याच्या कार्यवाहीमध्ये बाधा येणार नाही.

४) अशा प्रकारे परवाने वारसाच्या नावे वर्ग करतांना, याबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी अथवा अपर जिल्हाधिकारी यांनीच स्वतःच्या मंजुरीने करावी. या संदर्भात त्यांनी इतर अधिका-यांना प्राधिकृत करु नये.

५) हॉकर्स परवानाधारक मृत्यू पालवल्यास, त्याच्या वारसार हॉकर्स परवाना न देता, पूर्वीप्रमाणे किरकोळ केरोसीन परवाना देण्यात येईल. वारसदार स्वतः व्यवसाय करीत नसेल तर असा परवाना तात्काळ रद्द करण्यात येईल.

६) मृत केरोसीन परवानाधारकाच्या वारसाने केरोसीन विक्रीचा व्यवसाय स्वतः करणे बंधनकारक आहे.

७) उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे विहित मुदतीत किरकोळ अथवा हॉकर्स परवानाधारकांच्या वारसाने परवाना त्यांच्या नावे वर्ग करण्यासंदर्भात अर्ज सादर केला नसल्यास व विहित अटी व शर्तीनुसार वारस पात्र आढळून न आल्यास अशा ठिकाणी आवश्यकतेनुसार जाहिरातीव्दारे अर्ज मागवून किरकोळ केरासीन परवाने मंजुर करण्यात येतील.

**किरकोळ केरोसीन परवाने वारसाच्या नावे वर्ग करण्याबाबत.( शासन निर्णय क्र. रॉकेल-१००३/प्र.क्र.३२४९/ना.पु. २७/ दिनांक २५ मे २००४)**

किरकोळ/ हॉकर्स केरोसीन परवानाधारकाच्या हयातीत, परवाना वारसाच्या नावे वर्ग करण्याबाबत खालील अटीपैकी कोण्त्याही एका अटीची पर्तता झाल्यास संबधित परवानाधारकाच्या लेखी विनंतीवरुन तो परवाना त्याने प्रस्तावित केलेल्या वारसाच्या नावे वर्ग करता येईल. असा शासनाने निर्णय घेतलेला आहे.

१) जो केरोसीन परवानाधारक वृध्दापकाळामुळे (त्यांच्या वयाच्या ६५ वर्षानंतर) व्यवसायातून निवृत्ती स्विकारु इच्छितो(वयाबाबत नियमानुसार पुरावा सादर करणे आवश्यक)
२) जो केरोसीन परवानाधारक दीर्घकालीन आजारपणामुळे किंवा वैद्यकीय कारणास्तव व्यवसाय करण्यास कायमस्वरुपी असमर्थ ठरत असेल ( जिल्हा शल्य चिकित्सकाचे वैद्यकिय प्रमाणपत्र आवश्यक)
३) ज्या परवानाधारकास ६० टक्केपेक्षा जास्त अपंगत्व आलेले आहे व त्या अपंगत्वामुळे तो स्वतः व्यवसाय करण्यस सक्षम ठरु शकत नाही. ( जिल्हा शल्य चिकित्सकाचे वैद्यकिय प्रमाणपत्र आवश्यक)

अशा परवानाधारकाने स्वच्छेने त्यांच्या वारसापैकी एकाच्या नावे किरकोळ/हॉकर्स परवाना वर्ग करण्याबाबत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह अनुज्ञप्ती प्राधिका-याकडे लेखी विनंती अर्ज केल्यानंतरच अनुज्ञप्ती प्राधिकारी परवाना वारसाच्या नावे वर्ग करण्याबाबतची कार्यवाही करतील.

वरील प्रमाणे परवाना वारसाच्या नावे वर्ग करताना त्या संबधातील कार्यवाही जिल्हाधिकारी अथवा अपर जिल्हाधिकारी हे स्वतःच्या मंजूरीने करतील. हॉकर्स परवानाधारकाच्याबाबत परवाना वर्ग करताना वारसदारास हॉकर्स परवाना न देता किरकोळ केरोसीन परवाना देण्यात येईल.

किरकोळ केरोसीन परवाने वारसास मंजूर करणेसाठी वरीलप्रमाणे अटी शर्ती असल्या तरी शासन प्रचलित आदेशानुसार त्यामध्ये बदल करणेत येतो.

## गॅसधारकांची माहिती

| तालुकयाचे नाव | कार्डधारकांची संख्या | | | | केरोसीनची माहिती | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | दोन गॅस | एक गॅस | बिगर गॅस | एकूण | गरज कि.लि | मंजूर नियतन कि.लि | टक्के वारी |
| सावंतवाडी | ५१११ | ३६३६ | २९०५० | ३७७९७ | २५८ | १८० | ७० |
| दोडामार्ग | ० | ० | ९७५९ | ९७५९ | ७९ | ६० | ७० |
| कुडाळ | १०८९ | ३०५० | ३०४१० | ३४५४९ | ३०५ | २०४ | ७० |
| वेंगुर्ला | २०२९ | ७३०२ | १२३१७ | २१६४८ | १८१ | १२० | ७० |
| मालवण | १०५० | २१८० | २५९१४ | २९१४४ | २१७ | १६८ | ७० |
| कणकवली | १६६८ | ३३९ | ३१०३१ | ३३०३८ | २५७ | १८० | ७० |
| देवगड | ० | ४५० | २८४१८ | २८८६८ | २४४ | १६८ | ७० |
| वैभववाडी | ३५ | १०० | १३८६८ | १४००३ | ११४ | ७२ | ७० |
| एकूण | १०९८२ | २११०७ | १८०७६७ | २०८८०६ | १६५५ | ११५२ | ७० |

## सिंधुदुर्ग जिल्हयातील गॅस एजन्सीधारक

| अ.क्र. | तालुका | गॅस एजन्सीचे नांव | गॅस कंपनीचे नांव | एजन्सी धारकाचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | सावंतवाडी | पाटणकर गॅस सर्व्हिस | भारत गॅस | श्री. रामप्रसाद दत्ताराम पाटणकर, सावंतवाडी |
| २ | सावंतवडी (बांदा) | बांदा इंण्डेन | इंडियन ऑईल | श्री. अतुल सुंधाकर काळसेकर, बांदा |
| ३ | वेंगुर्ला | वेंगुर्ला गॅस सर्व्हिस | हिदुस्थान पेट्रोलियम | श्रीम. माधुरी मेघ:श्याम वेंगुर्लेकर, वेंगुर्ला |
| ४ | कुडाळ | कुडाळ तालुका खरेदी विक्री संघ, कुडाळ | हिदुस्थान पेट्रोलियम | चेअरमन-कुडाळ तालुका खरेदी विक्री संघ, कुडाळ |
| ५ | मालवण | सिंधुदूर्ग जिल्हा कृषी औधोगिक सर्व सेवा सरकारी गॅस एजन्सी, मालवण | हिदुस्थान पेट्रोलियम | चेअरमन-सिंधुदूर्ग जिल्हा कृषी औधोगिक सर्व सेवा सरकारी गॅस एजन्सी, मालवण |

# <u>रास्त भाव धान्य दुकान व्यवस्थापन मंजूरीकामी अधिकार/निकषाबाबतची माहिती.</u>

शासन निर्णय दि. २० जून २००६ अन्वये रास्त भाव धान्य दुकान प्राधिकार मंजूरीचे अधिकार जिल्हा पुरवठा अधिकारी यांना प्रदान करण्यात आलेले आहेत. रास्त भाव धान्य दुकान मंजूरीचे निकष खालीलप्रमाणे आहेत.

१) रास्त भाव धान्य दुकानासाठी तहसिलदार यांनी जाहिरनामा प्रसिध्द केलेल्या तारखेपासून १५ दिवसांचे आत संबंधित तहसिलदार यांजकडे अर्ज सादर करावेत.मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जात नाही.

२) ज्या व्यक्तीकडे किंवा त्याच्या कुटुंबाकडे तसेच सहकारी संस्थेकडे यापुर्वी एक किंवा अधिक धान्य दुकाने असल्यास अशा अर्जदार व्यक्तीचा/संस्थेचा विचार केला जात नाही.

३) अर्जदार संस्था नोंदणीकृत असल्यास संस्थेच्या आर्थिक परिस्थितीबाबत तसेच कार्यक्षमतेबाबत सहाय्यक निबंधक यांचे अभिप्राय जोडणे आवश्यक.

४) अर्जदार संस्था नोंदणीकृत नसल्यास तिच्या कायदेशीर अस्तित्वाबाबत पुरावा जोडणे आवश्यक.

५) व्यक्तीगत अर्जदाराने वर्तणुकीबाबत पोलीस अधिक्षक, सिंधुदुर्ग यांजकडील दाखला जोडणे आवश्यक.

६) व्यक्तीगत अर्जदाराने आर्थिक क्षमतेबाबत पोस्टाच्या/बँकेच्या पासबुकाची अद्यावत झेरॉक्स प्रत जोडणे आवश्यक.

७) अर्जदार व्यक्तीने रहिवासी दाखला जोडणे आवश्यक.

८) अर्जदार व्यक्तीने शैक्षणिक पात्रतेबाबत शाळा सोडल्याचा दाखला जोडणे आवश्यक.( अर्जदार व्यक्ती किमान शालांन्त/एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक) तसेच सुशिक्षित बेकार असल्यास समाज कल्याण विभागाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक.

९) अर्जदार व्यक्तीने (ग्रामीण विभाग असल्यास ) धान्य दुकान मंजूरीसाठी ग्रामसभेचा ठराव जोडणे आवश्यक. (धान्य दुकान अर्जदार व्यक्तीस देणेस दिलेला नाहरकत दाखला.)

१०) अर्जदार व्यक्ती/संस्था धान्य दुकान ज्या जागेत चालविणार ती जागा अकृषिक असलेबाबत बिनशेती आदेशाची प्रत तसेच ज्या जागेत दुकान चालविणार त्या जागेचा नकाशा आवश्यक

११) अर्जदार व्यक्ती/संस्था धान्य दुकान अन्य व्यक्तीच्या जागेत चालविणार असल्यास त्या जागेचा घरपत्रक उतारा तसेच संबंधित व्यक्तीचे/घरमालकाचे १००/- रुपयांचे स्टॅम्पपेपरवर संमत्तीपत्र आवश्यक.

१२) रास्त भाव धान्य दुकान मंजूर झालेनंतर सदर व्यक्ती/संस्थेस खुल्या बाजारातील तांदूळ/गहू विकता येणार नाही.

१३) जाहिरनामा महिलांसाठी प्रसिध्द झाला असल्यास फक्त महिला अर्जदारांचाच विचार केला जातो.

रास्त भाव धान्य दुकान अर्जदार व्यक्ती/संस्थेस मंजूर करणेसाठी वरीलप्रमाणे अटी शर्ती असल्या तरी शासन प्रचलित आदेशानुसार त्यामध्ये बदल करणेत येतो.

**रास्त भाव धान्य दुकान परवानाचालक मयत झाल्यास शासन निर्णय दि. २२ डिसेंबर १९९७ अन्वये परवानाचालकाच्या वारसास रास्त भाव धान्य दुकान मंजूर करावयाचे झाल्यास त्यासाठी निकष**

१) परवानाचालक मयत झाल्यास त्याच्या नावावरील परवाना त्वरीत रद्द करण्यात येतो.

२) परवाना चालक मयत झाल्यास त्याच्या कायदेशीर वारसास सदरचा परवाना चालवावयाचा असल्यास परवाना चालक मयत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सदर परवाना तात्पुरत्या स्वरुपात चालविण्यास जिल्हाधिकारी यांची परवानगी घेणे आवश्यक.

३) तद्नंतर सदर दुकानाचे कायम स्वरुपी व्यवस्थापन मंजूर होणेसाठी खालील अटींची पूर्तता करणे आवश्यक.

अ) मयत दुकानदाराच्या कालावधीत दुकानाचे कामकाजाबाबत गंभीर तक्रारी प्राप्त झालेल्या नसाव्यात.

ब) ज्या व्यक्तीच्या नांवे परवाना द्यावयाचा झाल्यास त्या वारसाला इतर वारसांची स्पष्ट व लेखी संमत्ती असणे आवश्यक. वारसांमध्ये मतभेद असल्यास अर्ज करणाऱ्या वारस व्यक्तीस परवाना देता येत नाही.

क) ज्या वारसाच्या नांवे परवाना द्यावयाचा आहे, ती व्यक्ती दुकान चालविणेस सक्षम असावी.तसेच सर्वसाधारण अटींप्रमाणे त्याच्याकडे पुरेशी जागा, भांडवल इत्यादी बाबी असणे आवश्यक.

ड) अर्जदार वारस व्यक्तीने मंजूर होणारे धान्य दुकान स्वत: चालविले पाहिजे.

इ) संबंधित वारसाचा चरितार्थ मंजूर होणाऱ्या रास्त भाव धान्य दुकानावरच अवलंबून असलेबाबत पुरावा.

ई) वारसामध्ये पती किंवा यथास्थितीत पत्नी तसेच सज्ञान मुलगा, सज्ञान अविवाहित मुलगी,अवलंबित आई किंवा वडील यांचाच फक्त विचार केला जाईल.

५) रास्त भाव धान्य दुकान वारसास मंजूर करताना वेगळा जाहिरनामा प्रसिध्द करणेत येत नाही.

रास्त भाव धान्य दुकान वारसास मंजूर करणेसाठी वरीलप्रमाणे अटी शर्ती असल्या तरी शासन प्रचलित आदेशानुसार त्यामध्ये बदल करणेत येतो.

**राास्त भाव धान्य दुकान मंजूरीसाठी विचारात घेण्यात येणारी अग्रक्रमसूची ( इतर क्षेत्र)**

१) सुशिक्षित बेरोजगार व्यक्ती ( पुरुष किंवा स्त्री)
२) स्त्रियांची ग्राहक सहकारी संस्था.
३) इतर ग्राहक सहकारी संस्था
४) ग्राम पातळीवरील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था
५) अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमातीमधील व्यक्ती.
६) स्वातंत्र्यसंग्राम सैनिक.
७) माजी सैनिक ( या सैनिक कारवाईत मृत सैनिकांची विधवा पत्नी त्यांचा मुलगा अगर लग्न न झालेली मुलगी यांचा समावेश आहे.)
८) अपंग व्यक्ती
९) प्रकल्पग्रस्त व्यक्ती.
१०) इतर

वर नमूद केलेल्या अग्रक्रम सूचीमध्ये शासन प्रचलित आदेशानुसार बदल करणेत येईल.

**आधारभूत किंमत धान खरेदी योजना-**

सन २००६-२००७ या खरीप पणन हंगामात किमान आधारभूत योजनेअंतर्गत या जिल्हयात धान खरेदीची कार्यवाही जिल्हा मार्केटींग अधिकारी सिंधुदुर्ग मुख्य खरेदी अभिकर्ता यांचे मार्फत करणेत येते. चालू वर्षात खरेदी अभिकर्ता यांचेकडून दिनांक ३१/०१/२००७ अखेर सर्वसाधारण प्रतीचे प्रति क्विंटल रक्कम रु. ५७०/- या दराने १७४०७.७६ क्विंटल भात धानाची खरेदी करणेत आलेली आहे.

सदर निविदापैकी भात भरडाई समितीने १)आजरा तालुका किसान सहकारी भात खरेदी विक्री संघ लि. आजरा २) पुष्कर मॉडर्न राईस मिल हरकुळ बुद्रुक, ता. कणकवली ३) मे. सात्विक बासमती राईस मिल कोल्हापूर यांचेमार्फत धान भरडाईची कार्यवाही सुरु आहे. शासन स्तरावरुन धान भरडाईस दि. ३१/०५/२००७ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे.

**धान्य दुकानांचा तपशिल.**

| एकूण महसूली गांव | धान्य दुकान असलेली गांवे | धान्य दुकानांची संख्या | धान्य दुकान नसलेली गांवे |
|---|---|---|---|
| ७४६ | ३६२ | ४१५ | ३८४ |

## सिंधुदुर्ग जिल्हयातील नियंत्रित साखर परवानाधारक - ७

| अ.क्र. | साखर परवानाधारकाचे नांव | एप्रिल २००७ मंजुर साखर (क्विटल) |
|---|---|---|
| १ | सावंतवाडी तालूका सहकारी खरेदी विक्री संघ लि. सावंतवाडी | १५० |
| २ | कुडाळ तालूका खरेदी विक्री संघ लि. कुडाळ | २८५ |
| ३ | वेंगुर्ला तालूका खरेदी विक्री संघ लि. वेंगुर्ला | १५० |
| ४ | मालवण तालूका खरेदी विक्री संघ लि. मालवण | १५० |
| ५ | देवगड तालूका खरेदी विक्री संघ लि. देवगड | १०० |
| ६ | शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघ लि. कणकवली. | २०० |
| ७ | शेतकरी सहकारी संघ लि. कोल्हापूर, शाखा वैभववाडी. | ६० |
| | **एकूण** | **१०९५** |

**नियतन** :- सिंधुदुर्ग जिल्हयासाठी माहे एप्रिल २००७ करीता शासनाने १०९५ क्विंटल साखर मंजूर केलेली आहे.

**प्रमाण** :- केंद्र शासन राज्यातील दारिद्रय रेषेखालील कार्डधारकांना दरमाणसी ५०० ग्रॅम ( प्रौढ अथवा मूल/बालक असा भेदभाव न करता) दरमहा नियंत्रित साखरेचे परिमाण ठरवून दिलेले आहे.

**दर** :- प्रति किलो १३.५० या किरकोळ विक्री दराने शिधापत्रिकाधारकांना साखर वितरीत केली जाते.

## १०) साखर. -

सिंधुदूर्ग जिल्हयासाठी **मार्च २००७ या महिन्यासाठी ८१० क्विंटल साखर तात्यासाहेब कोरे, स.सा.का.लि. वारणानगर, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर** यांचे कारखान्यातून नियतन मजूर झालेले होते त्या प्रमाणे ८१० क्विंटल साखर उचल झालेली असून वाटप करण्यात आलेले आहे. एप्रिल, २००७ चे नियमित नियंत्रित साखर **१०९५ क्विटल गडहिंग्लज स.सा.का.लि. गडहिंग्लज , जि. कोल्हापूर** नियतन मंजूर झाले असून उचल सुरु आहे.

**शासनाने सिंधुदुर्ग जिल्हयासाठी एपीएल, बीपीएल, अंत्योदय, सं.ग्रा.रो.यो अन्न योजनेअंतर्गत सन २००७-०८ व सं.ग्रा.रो.यो सन २००६-०७ या वर्षासाठी मासिक नियतन खालील प्रमाणे मंजूर केलेले आहे.**

मजूर नियतन

(आकडे मे. टनात )

| | एपिएल | | बीपीएल | | अंत्योदय | | सं.ग्रा.रो.यो. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | तांदूळ | गहू | तांदूळ | गहू | तांदूळ | गहू | तांदूळ |
| एप्रिल, २००७ चे मासिक नियतन | १५० | १०० | १४५२ | ३७३ | ५५८ | १९३ | ६३८७ |

## मंजूर धान्य नियतनातून तालुकानिहाय धान्याचे वाटप केले जाते.

| अ.क्र | गोदामाचे नांव | एपीएल | | बीपीएल | | अंत्योदय | | सं.ग्रा.रो.यो. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | तांदूळ | गहू | तांदूळ | गहू | तांदूळ | गहू | तांदूळ |
| १ | सावतवाडी | २० | १० | २२० | ३० | २० | २० | १३२१.०६० |
| २ | वेंगुर्ला | ३० | २० | १९० | ८० | ३० | ५० | ४९४.३६३ |
| ३ | कुडाळ | २० | ० | ३७२ | ७० | ३५८ | ५३ | ११५३.५५ |
| ४ | कणकवली | १० | ३० | २०० | ५३ | २० | १० | ८९१.४२ |
| ५ | मालवण | २० | ० | ३०० | ४० | ३० | २० | ६७९.४४२ |
| ६ | आचरा | १० | १० | ५० | २० | २० | १० | २००.०० |
| ७ | देवगड | २० | १० | १२० | ३० | ३० | १० | ४९२.०७ |
| ८ | विजयदूर्ग | १० | १० | ० | २० | १० | १० | १००.०० |
| ९ | वैभववाडी | १० | १० | ० | ३० | ४० | १० | ३५५.०९१ |
| | **एकूण** | **१५०** | **१००** | **१४५२** | **३७३** | **५५८** | **१९३** | **५६८६.९९६** |

## धान्याचे दर व परिमाण.

| धान्याचे दर | एपीएल | | बीपीएल | | अंत्योदय | | साखर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | तांदुळ | गहु | तांदुळ | गहु | तांदुळ | गहु | |
| घाऊक दर | ८,३००/- | ६१००/- | ५६५०/- | ४१५०/- | ३०००/- | २०००/- | १३४३.६४ |
| किरकोळ दर | ९.५० | ७/- | ६/- | ५/- | ३/- | २/- | १३.५० |
| धान्याचे परिमाण प्रतिकार्ड किलो मध्ये | १५ | २० | २५ | १० | २३ | १२ | ५०० ग्रॅम माणशी |

--------------------------- η η ηη ---------------------------------------